**निशाणी क्रमांक ३५ वर आदेश**:
( पारित दिनांक : ०७—०१—२०१६ )

०१. प्रतिवादी क्रं.२ व ३ यांनी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्रं.४ यांचेविरूध्द जैसे थे आदेश मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्रं.२ व ३ कथन करतात की, दावा मिळकतीमध्ये ते वास्तव्य करतात. त्यांचे शेजारी मंगल गुरव, दिनेश गुरव व इतर त्यांच्या घरात धावत आले, त्यांना मारहाण करण्यास सुरूवात केली तसेच घराचे छत काढून टाकले. चौकशी केली असता प्रतिवादी क्रं.२ व ३ यांना समजले की, प्रतिवादी क्रं.४ यांनी दावा मिळकत बेकायदेशीरित्या ती—हाईत व्यक्तीस विक्री केलेली आहे. प्रतिवादी क्रं.२ व ३ यांचे लाभात जैसे थे आदेश केला नाही तर त्यांचे पैशाने भरून न येणारे नुकसान होणार आहे.

०२. प्रतिवादी क्रं.४ यांनी नि.४१ लगत म्हणने दाखल करून प्रतिवादी क्रं.२ व ३ यांची अर्जातील कथने नाकारलेली आहे. प्रतिवादी क्रं.४ कथन करतात की, त्यांनी दावा मिळकत दि.२३.०१.२०१५ रोजीच्या खरेदीखता अन्वये शंकर गुरव यांना विक्री केलेली आहे. दावा मिळकतीचा ताबा व मालकी शंकर गुरव यांची आहे. त्यांना दाव्याच्या कामी पक्षकार म्हणून सामील केलेले नाही. अशा परिस्थितीमध्ये अर्ज फेटाळण्यास पात्र आहे.

०३. अर्ज, म्हणने अभिलेखावर दाखल केलेली कागदपत्रे, याचे अवलोकन केले. प्रतिवादी क्रं.२ व ३ तसेच प्रतिवादी क्रं.४ यांचे विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. वादी यांचे विधिज्ञ यांनी प्रतिवादी क्रं.२ व ३ यांना पुरक युक्तीवाद केला.

०४. खालील मुद्दे माझ्या पडताळणीस उपस्थित झाले असून त्यावरील निष्कर्ष व कारणमिमांसा खालीलप्रमाणे आहेत :—

| **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. काय प्रतिवादी कं.२ व ३ जैसे थे आदेश मिळण्यास पात्र आहेत ? | .. | नकारार्थी |
| २. काय हुकूम ? | .. | अर्ज फेटाळण्यात येत आहे. |

## : कारणमिमांसा :

०५. **मुद्दे कमांक १ व २ करिता** :—

या ठिकाणी सर्वप्रथम नमुद करणे आवश्यक आहे की, प्रतिवादी कं.२ व ३ ज्यांच्या विरूध्द तकारी करत आहेत ते म्हणजेच मंगल गुरव, दिनेश गुरव व इतर हे दाव्यात पक्षकार नाहीत. वादी यांनी प्रतिवादी यांच्या विरूध्द प्रस्तुतचा दावा वाटप होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे. खरेदीखत दस्त दि.२६.०६.२०१२ नोंदणी कमांक २८५६/२०१२ याची प्रत वादी यांनी अभिलेखावर दाखल केलेली आहे. सदर दस्ताचे अवलोकन केले असता दावा मिळकत शांताबाई महादेव गुरव यांनी प्रतिवादी कं.४ यांना विकी केलेली आहे. सदर दस्तास वादी कं.२ व प्रतिवादी कं.२ यांनी मान्यता दिलेली आहे. सदरचा दस्त वादी अथवा प्रतिवादी यांनी आव्हानीत केलेला नाही. सदर खरेदीखत दस्तांनुसार दावा मिळकतीची मालकी व ताबा प्रतिवादी कं.४ यांच्याकडे आलेला आहे.

०६. अभिलेखावरील खरेदीखत दस्त दि.२३.०१.२०१५ नोंदणी कं. ३५२/२०१५ याचे अवलोकन केले असता दावा मिळकत प्रतिवादी कं.४ यांनी शंकर गजानन गुरव यांना विकी केलेली आहे. सदर खरेदीखत दस्तानुसार दावा मिळकतीचा ताबा व मालकी शंकर गुरव यांच्याकडे आहे.

शंकर गुरव यांच्या नावाची नोंद महसुल दप्तरी देखील झालेली आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी कं.२ व ३ यांना सकृतदर्षी केस नाही, न्यायाचा तराजू देखील प्रतिवादी कं.२ व ३ यांचे बाजूने नाही. प्रतिवादी कं.२ व ३ यांचा अर्ज नामंजूर केल्यास त्यांचे कशानेही भरून न येणारे नुकसान होणार नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादी जैसे थे आदेश मिळण्यास पात्र नाहीत. परिणामी मी मुद्दा कमांक १ ला नकारात्मक उत्तर देत आहे व मुद्दा कमांक २च्या उत्तरादाखल खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे :—

## **आदेश**

१. अर्ज फेटाळण्यात येत आहे.

२. खर्चाचा हुकूम अंतिम निकालाच्या वेळी केला जाईल.

( वै. चिं. जोशी )

खालापूर    सह दिवाणी न्यायाधिश, क.स्तर,
दिनांक: ०७—०१—२०१६    खालापूर.